तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet : www.dte.org.in

अतितात्काळ/ईमेलव्दारे
कालमर्यादित- दि. 29.10.2016 पुर्वी

क्रमांक : 10/एनजीपी/पदविका/2016/ १४५२
दिनांक : 25 OCT 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/ पुणे.

विषय:- शैक्षणिक वर्ष 2016-17 मध्ये प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र/ थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित संस्थेत अलॉटमेंट झालेले तद्नंतर ARC मध्ये प्रवेश निश्चिती शुल्क भरलेले परंतु विहित कालावधीत संबंधित संस्थेत प्रवेश निश्चित न केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यता देणेबाबत...

संदर्भ:- 1. या संचालनालयाचे पत्र क्रमांक 10/एडीएम/पदविका/2016/1175, दि. 08.09.2016, 1359 दि. 10.09.2016.
2. इतर विद्यार्थ्यांकडुन प्राप्त झालेले अर्ज
3. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रानिप्रा/थेट व्दितीय वर्ष/प्रवेश/2016/88 दि. 21.10.2016.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2016-17 मध्ये प्रथम तसेच थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम आणि प्रथम वर्ष पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमात शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित संस्थेत केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत अलॉटमेंट झालेले तद्नंतर प्रवेश निश्चिती केंद्रावर (ARC) प्रवेश निश्चिती शुल्क भरलेले परंतु विहित कालावधीत संबंधित संस्थेत प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते. त्याअनुषंगाने उपरोक्त विषय प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक 19/10/2016 च्या बैठकीत पदविका अभ्यासक्रमात प्रवेशित 328 विद्यार्थ्यांच्या प्रवेशास व तत्सम पदविका विद्यार्थ्यांचे प्राप्त झालेल्या अर्जानुसार सामाईक प्रवेश प्रक्रियेदरम्यान प्रवेश निश्चिती केंद्रावर (ARC) विहित कालावधीत प्रवेश निश्चित केलेल्या प्रवेशांना संदर्भिय पत्र क्रमांक 3 अन्वये खालील अटीच्या अधिन राहुन मान्यता देण्यात आली आहे.

1. उपरोक्त संबंधित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची निश्चिती संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांचेमार्फत संबंधित विद्यार्थ्यांच्या कागदपत्राची तपासणी त्वरीत करुन सदर विद्यार्थ्यांचे प्रवेश संकेतस्थळावर दि. 29.10.2016 पुर्वी अपलोड करण्यात यावे. सदर विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चिती / अपलोड करताना संस्थेने संबंधित विद्यार्थ्यांची आवश्यक ती मुळ कागदपत्रे घेऊन प्रत्यक्ष सहसंचालकाच्या कार्यालयात उपस्थित रहावे.

2. ज्या विद्यार्थ्यांना संस्थास्तरावरील कोटयातुन CAP मध्ये प्रवेश रुपांतरित केल्याने शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना लागु होत आहे, अशा विद्यार्थ्यांकडुन संस्थास्तरावर प्रवेश देताना घेण्यात आलेले शुल्क/अतिरिक्त शुल्क विद्यार्थ्यांना धनकर्षव्दारे आगाऊ अदा करावे व सदरची माहिती यादीसह प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे तात्काळ सादर करण्यात यावी.

3. सदर विद्यार्थ्यांचे आता विलंबाने प्रवेश निश्चिती / अपलोड केल्यामुळे कोणत्याही प्रकारचे टर्म वर्क व हजेरीच्या कारणास्तव शैक्षणिक नुकसान किंवा न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास त्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची स्वत:ची असेल व प्रवेश नियामक प्राधिकरण त्यास जबाबदार राहणार नाही, असे संबंधित संस्था व पालकां/विद्यार्थ्यांचे लेखी हमीपत्र आपलेमार्फत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे सादर करण्यात यावे.

4. जे प्रवेश, प्रवेश निश्चिती केंद्रावर (ARC) प्रवेश निश्चित करण्यात आले होते, परंतु संबंधित संस्थेने त्यांचे प्रवेश वेळेत CAP अंतर्गत अपलोड न करता व संस्थास्तरावर निश्चित केलेले आहेत, असे प्रवेश कॅपअंतर्गत असल्याने CAP नियमित करण्यास प्राधिकरणाकडुन मान्यता देण्यात येत आहे. मात्र अशा प्रवेशासाठी संबंधित संस्थांनी प्रति विद्यार्थी रु. 10,000/- दंड "The Secretary, Admissions Regulating Authority" याच्या नावे धनाकर्षाद्वारे (Demand Draft) संबंधित मुलांच्या नावाच्या यादीसह सादर करुन सहसंचालकामार्फत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्याकडे भरण्यात यावा. सदर दंड भरल्यानंतर विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची माहिती संकेतस्थळावर दि. 29.10.2016 पुर्वी अपलोड करण्यात यावी. सदर दंड कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांकडुन घेण्यात येवू नये. तसे आढळल्यास संस्थावर कठोर कार्यवाही करण्यात येईल, यांची सूचना संबंधित संस्थेचा प्राचार्यांना देण्यात यावी.

5. सदर प्रक्रिये दरम्यान संस्थाकडुन करण्यात आलेली दिरंगाई पुन:श्च होणार नाही, याची हमी संबंधित संस्थांनी द्यावी.

6. प्रवेश अपलोड करताना CAP मधुन Allotment च्या पत्राची (Print) ARC मध्ये विहित D.D. सह विहित कालावधीत Reporting केल्याची Print Out आणि संस्थेने त्या विद्याशाखेत आता जागा रिक्त असल्याची खात्री करुन प्रकरण निहाय तपासणी करावी.

7. सदर कार्यवाहीची एकवेळेची बाब म्हणुन मान्यता देण्यात येत असुन भविष्यात सदर बाब पुर्वोदाहरण म्हणुन ग्राहय धरली जाणार नाही.

तरी, सदर पत्रान्वये संबंधित सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, संदर्भिय पत्र क्रमांक 3 मधील उपरोक्त नमुद अटीच्या अनुषंगाने सदर बाब संबंधित सर्व संस्थांना लेखी निदर्शनास आणुन सदर कार्यवाही दि. 29.10.2016 पुर्वी तात्काळ प्रथम प्राधान्याने करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
म.रा. मुंबई.

प्रतिलिपी:- 1. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. प्रणाली विश्लेषक, कार्यासन क्र. 3, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर पत्र या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी व वर नमुद कालावधीत फक्त संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयास संबंधित विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यासाठी या संचालनालयाच्या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करुन देण्यात यावी.
3. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई - 400 051 यांना कळविण्यात येते की, वर नमुद विद्यार्थ्यांचे Enrollment, परिक्षा अर्ज इत्यादीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही आपल्या स्तरावर करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करण्यात यावा.

प्रत:- संबंधित पदविका संस्थेतील प्राचार्यांना कळविण्यात येते की, वर नमुद केल्यानुसार आवश्यक दस्तऐवजासह संबंधित विभागीय कार्यालयात तात्काळ उपस्थित राहुन प्रवेश निश्चितीची कार्यवाही दि. 29.10.2016 पुर्वी पुर्ण करावी.

सदर प्रकरणी विलंब होऊन विहित कालावधीत कार्यवाही पुर्ण करुन न घेतल्यास होणाऱ्या परिणामास आपण जबाबदार राहणार, याची नोंद घेण्यात यावी,

1. प्राचार्य, अवधुत डिप्लोमा कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, भोजापुर
2. प्राचार्य, प्रेमला विठ्ठलदास पॉलीटेक्नीक(डिप्लोमा), मुबई.
3. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे
4. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, कराड
5. प्राचार्य, श्री भगुभाई मोफतलाल पॉलीटेक्नीक, मुंबई
6. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नागपुर
7. प्राचार्य, विरमाता जिजामाई टेक्नीकल इन्स्टिटयुट , माटुंगा, मुंबई
8. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे
9. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तिजापुर
10. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद
11. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई
12. प्राचार्य, शासकीय निवासी मुलींचे पॉलीटेक्नीक, यवतमाळ.
13. प्राचार्य, के.सी.ई कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अॅन्ड इंजिनियरिंग टेक्नॉलॉजी, जळगांव
14. प्राचार्य, एस. एच. जोधळे पॉलीटेक्नीक, डोंबिवली
15. प्राचार्य, डॉ. राजेश रामदासजी कांबे पॉलीटेक्नीक, मुर्तिजापुर, जि. अकोला.
16. प्राचार्य, भोसला एज्युकेशन ट्रस्टचे भोन्सला पॉलीटेक्नीक, जि. अकोला
17. प्राचार्य, रसिकलाल एम. धारीवाला इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, चिंचवाडगाव, पुणे
18. प्राचार्य, गीताई चॅरिटेबल ट्रस्टचे खुराना सावंत इन्स्टिटयुट ऑफ इंजिनियरिंग, हिंगोली
19. प्राचार्य, श्री समर्थ पॉलीटेक्नीक, ता. पारनेर, जि. अहमदनगर
20. प्राचार्य, विद्या एज्युकेशन सोसायटीचे कांचन सुधा पॉलीटेक्नीक, धनोरे
21. प्राचार्य, डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान, यशवंतराव भाऊराव पाटील पॉलीटेक्नीक, पुणे.
22. प्राचार्य, पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पॉलीटेक्नीक, निगडी
23. प्राचार्य, गौरी शिव पॉलीटेक्नीक, खटाव, जि. सातारा
24. प्राचार्य, कांचनगंगा सुधा पॉलीटेक्नीक, धनोरे
25. प्राचार्य, यशदिप इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, पाथर्डी,
26. प्राचार्य, जी. एच. रायसोनी ऑफ इंजिनियरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी, वाघोली . पुणे
27. प्राचार्य, साई इन्स्टिटयुट ऑफ इंजिनियरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी, जि. औरंगाबाद
28. प्राचार्य, यशोदिप इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी परधरी, जि. औरंगवाद.
29. प्राचार्य, इतर उर्वरित संबंधित पदविका संस्था.

---

प्र.क्र. विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०१६/ 3376
सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
अमरावती.
दिनांक:- 26 OCT 2016

प्रति, १) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तिजापुर,
२) प्राचार्य, शासकीय निवासी महीला तंत्रनिकेतन यवतमाळ
३) प्राचार्य, डॉ. राजेश रामदासजी कांबे तंत्रनिकेतन, मुर्तिजापुर.
४) प्राचार्य, भोसला तंत्रनिकेतन, अकोला.

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रामध्ये नमुद सुचनेनुसार व दिलेल्या मुदतीत आवश्यक कार्यवाही प्रथम प्राधान्याने करावी.



सहसंचालक तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, अमरावती.

प्रत:- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याकरीता.